पुण्य नगरी

# महिलांनो प्रशिक्षण घ्या, आत्मनिर्भर व्हा : रिंगणे

**गडहिंग्लज : प्रतिनिधी**

महिलांमध्ये पाककलेसह अनेक कला व कौशल्य आहेत. त्याला प्रशिक्षणाची आणि व्यावसायिकतेची जोड देऊन महिलांनी स्वतःच्या पायावर उभे राहावे, आत्मनिर्भर व्हावे, असे आवाहन प्राचार्या मीना रिंगणे यांनी केले.

राष्ट्रीय सहकारी संघाच्या सहकार्याने श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीतर्फे आयोजित महिला उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्‌घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. त्यांच्या हस्ते फॅशन डिझायनिंग व कापडी पिशव्या तयार करणे या दोन कोर्सचा शुभारंभ झाला.

## महिन्यात दुसरे प्रशिक्षण

राष्ट्रीय सहकारी संघाच्या सहकार्याने रवळनाथतर्फे देशात सर्वप्रथम आयोजित ब्युटी पार्लर व कापडी पिशव्या तयार करण्याचे प्रशिक्षण नुकतेच पार पडले. ८० महिलांनी त्याचा लाभ घेतला. त्यापाठोपाठ कापडी पिशव्या तयार करणे प्रशिक्षणाची दुसरी बॅच व फॅशन डिझायनिंगचा कोर्सही सुरू करण्यात आला आहे. दोन्हीत मिळून एकूण ८० महिला सहभागी झाल्या आहेत. त्यामुळे रवळनाथाच्या या अभिनव उपक्रमाचे विशेष कौतुक होत आहे.

रिंगणे म्हणाल्या, रवळनाथचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी गडहिंग्लज व परिसरातील गरजू महिलांसाठी खास दिल्लीतून विविध कोर्सेसना परवानगी आणली आहे.

यावेळी रवळनाथचे जनसंपर्क अधिकारी बाबासाहेब मार्तंड, श्वेता टोणन्नावर, प्रशिक्षिका स्नेहल दंडगे, स्वप्नाली निंबाळकर, सविता मांडेकर, रत्नमाला मांडे, तेजस्विनी हिरेमठ यांच्यासह प्रशिक्षणार्थी महिला उपस्थित होत्या. प्रशिक्षिका सीमा साळुंखे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रशिक्षिका शुभांगी बुटे यांनी आभार मानले.

Kolhapur Edition
Mar 23, 2023 Page No. 6
Powered by : eReleGo.com